सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ९३ | बुधवार, दि. २४ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com






**श्री. गुरुनामल बठेजा**
संपादक : अमळनेर हेडलाईन्स



**श्री. जयंत पाटील**
जे. व्ही. ट्रॅव्हल्स, अमळनेर



**श्री. विनोद कोठावदे**
प्रताप महाविद्यालय, अमळनेर



**श्री. प्रवीण पवार**
वीज वितरण कंपनी





# दोन बाया मारून गाडल्या? गुप्तधनासाठी खड्डा खोदला की काळ्या जादूचा काही प्रकार आहे ?

## अनेक प्रश्न...तितक्याच शंका– कुशंका मात्र खोदा पहाड निकला कुछ भी नही...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील शिरुड, अंबापिंप्री व कावपिंप्री या तिन्ही गावांच्या शेत शिवाराच्या मध्यभागी शुक्रवार, दि. २० डिसेंबर रोजी अमावस्येच्या रात्री जेसीबीच्या साह्याने मोठा खड्डा खोदण्यात आला आणि तो बुजविण्यातही आला. सकाळी तिन्ही गावांचे ग्रामस्थ कामानिमित्त घराबाहेर पडल्यावर त्यांना हा रस्त्यावरील प्रकार दिसला. तो पाहता बरोबर त्यांच्यातील अनेक मंडळींना हा प्रकार जादू टोण्याचा, घातपाताचा किंवा गुप्त धनासाठीचा वाटला.

त्यातच शिदोड जरी दिसला तरी नाग दिसला असा अंदाजे सांगणाऱ्यांपैकी काहींनी पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना घाबरत– घाबरत अत्यंत लगबगीने कॉल करून कळविले. श्री. निकमही प्रसंगाचे गांभिर्य व खबर देणाऱ्यावर नितांत विश्वास असल्याने तत्काळ फौज फाट्यासह घटनास्थळी पोहोचले. तेथे अर्थातच बघ्यांची मोठी गर्दी होतीच. थंडीतही अनेकांना घाम सुटला होता. श्री. निकम व त्यांची टीमही ही काय नवी उपादी आली या विचाराने आणि खबर देणारा चुकीचे सांगूच शकत नाही यामुळे धास्तावलेलीच होती. सर्वांनी त्यांच्या– त्यांच्या आवडत्या देवाचे नाव घेऊन खोदकाम सुरू केले. खोदत गेले.. खोदत गेले.. आता अगदी पाणी लागते की काय ? अशी वेळ येऊन ठेपली तरी काहीच निघाले नाही. 'खोदा पहाड निकला चुहा' अशी एक म्हण आहे. सदर खड्ड्यातून चुहा काय शिदोडही निघाला नाही. त्यामुळे विविध कहाण्या रचणारे...तर्क पंडित मंडळी व पोलीस दलासह उपस्थितांचे चेहरे अवर्णनीय होते. परत जाताना अनेकांना हात चोळत परत जावेसे वाटले. मात्र, अनेकांचे हात मातीने भरल्यामुळे त्या बिचाऱ्यांना तेही करता आले नाही. सदर प्रकाराची चर्चा सर्वत्र सुरू आहे. अर्थात अमावस्येच्या रात्री तीन रस्त्यांच्या मधोमध खड्डा का व कोणी खोदला ? हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरीतच आहे. या प्रश्नाचा खुलासा होत नाही, योग्य तो तालतपास लागत नाही तोपर्यंत कहाण्या रचणारे रचत राहतील..तर्क पंडितांना रिकामा वेळ घालविण्यासाठी एक संधी मिळाली आहे. इतकेच या प्रकाराचे फलित आहे.

> कोणतीही संशयास्पद बाब पोलिसांना जरूर कळवा. मात्र, घटनेचे गांभिर्य आणि त्यातील तथ्य तपासूनच योग्य ती माहिती पोलिसांना द्या. अन्यथा पोलिसांचा वेळ व श्रम वाया जातात. नागरिकांमध्येही उगीचच घबराहट आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण होते.
>
> **– दत्तात्रय निकम,**
> पोलीस निरीक्षक, अमळनेर.





(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# बसचा धक्का लागून खाली पडल्याने दोन विद्यार्थिनी जखमी

## आगार व्यवस्थापनाचा भोंगळ कारभार, पालकांसह प्रवाशांची नाराजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर– एकरुखी ही बस आगारातून फलाटावर लागत असताना बसचा धक्का लागल्याने दोन विद्यार्थिनी जखमी झाल्या आहेत. ही घटना मंगळवार, दि. २३ डिसेंबर रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास घडली. सदर विद्यार्थिनींच्या पायाला दुखापत झाली असून, त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एकरुखी येथील मयुरी अनिल पाटील (इयत्ता तिसरी, साने गुरुजी विद्यामंदिर, अमळनेर) व राढावण येथील जानवी नितेश पवार (इयत्ता पाचवी, डी. आर. कन्या शाळा) अशी विद्यार्थिनींची नावे आहेत. आगार व्यवस्थापनाच्या दुर्लक्षामुळे अशा घटना वारंवार घडत असून, याकडे लक्ष देण्याची मागणी प्रवाशांसह पालकांनी केली आहे. या घटनेनंतर बस आगारात मोठी गर्दी जमली होती. काही प्रवाशांनी जखमी विद्यार्थिनिंना काही प्रवाशांनी अमळनेर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दोन्ही विद्यार्थिनींना पायाला गंभीर दुखापत झाल्याचे सांगितले. त्यानंतर साने गुरुजी विद्यामंदिराचे शिक्षक बापूराव ठाकरे व द्रौ. रा. कन्या शाळेचे शिक्षक दिनेश पालवे यांनी विद्यार्थिनींना खासगी रुग्णालयात दाखल केले.

शाळेच्या वेळेमध्ये बस आगारात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होते. अनेक जण आगारात बेशिस्तीने वाहने लावत असल्याने प्रवाशांना उभे राहण्यासही जागा नसते. अनेक बस गाड्या नेमून दिलेल्या फलाटावर लागत नाहीत. मध्येच बस गाड्या उभ्या करत असतात. त्यामुळे अशा घटना वारंवार घडतात. याबाबत आगार व्यवस्थापनाने गांभिर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांसह पालकांकडून होत आहे.

> बस फलाटावर लागत असताना ही घटना घडली आहे. गर्दीमुळे विद्यार्थिनींना बसचा धक्का बसला आहे. दोन तरुणी देखील खाली पडल्या आहेत. बस आगारात जागा अपूर्ण असल्याने काही गावांच्या बस गाड्या नाईलाजास्तव रिकाम्या जागी थांबविल्या जातात.
>
> **– पी. बी. चौधरी,**
> बस आगार प्रमुख, अमळनेर.

## दिनविशेष

२४ डिसेंबर

- राष्ट्रीय ग्राहक दिवस
- स्वातंत्र्यवीर सावरकरांना जन्मठेपेची आणि काळ्या पाण्याची शिक्षा.
- पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ साने गुरूजी नामवंत साहित्यिक, बालसाहित्यिक, समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिक यांचा जन्म.
- इंद्र बानिया भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार यांचा जन्म.
- नीरज चोप्रा भारतीय भालाफेकपटू यांचा जन्म
- एम. जी. रामचंद्रन अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री यांचे निधन.
- जैनेंद्र कुमार भारतीय लेखक यांचे निधन.




पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र व्हायरल होत असलेला मजेशीर... मस्त मॅसेज...!

# बागायत कापूस उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित!

## कृषिभूषण साहेबरावदादा पाटलांची दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अवकाळी पावसाने बागायत कापूस क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र, कृषी व महसूल विभागाच्या संयुक्त अहवालात बागायत कापूस क्षेत्र हेतुपुरस्सर डावलण्यात आले आहे. परिणामी शेतकरी शासनाच्या अनुदानापासून वंचित आहेत. त्यामुळे दूर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहे.

पत्रात म्हटले आहे, की तालुक्यातील खरीप हंगाम २०२५ कृषी आणि महसूल विभागाच्या अहवालानुसार ६५ हजार ५९३ हेक्टर पीक लागवडीखालील क्षेत्र आहे. त्यापैकी ३५ हजार ९९८ हेक्टरमध्ये जिरायत कापूस लागवड २२ हजार ४७४ आणि बागायत कापूस क्षेत्र ९ हजार ४३३ एवढे आहे. मात्र, २७ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर या कालावधीत अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करताना १२ नोव्हेंबर २०२५अन्वये जिल्हा कृषी अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांनी नाशिक अप्पर आयुक्त व मदत पुनर्वसन विभागाचे सचिव यांच्याकडे अहवाल पाठविला आहे. यात अमळनेर तालुक्यातील कापूस लागवडीचे एकूण क्षेत्र ३५ हजार ९९८ हेक्टरपैकी २२ हजार ४७४. ३६ एवढ्या जिरायत क्षेत्राचा पंचनामा दाखविण्यात आला आहे. मात्र, ९ हजार ४३३ हेक्टर बागायत कापूस क्षेत्राचा हेतुपुरस्सर पंचनामे झालेले नाहीत. त्यामुळे शेतकरी नुकसानीच्या अनुदानापासून वंचित आहेत. अनुदानापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांविरूद्ध शासकीय कर्तव्यात विलंब आणि पालनातील कसुरीबाबत शिस्तभंगाची कारवाई व्हावी. पत्राच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना रजिस्टर पोस्टाने, ई- मेल व व्हॉट्सॲपवर कार्यालयाकडे पाठविण्यात आल्या आहेत.

**मुख्यमंत्र्यांना दिले पत्र**












**विकासाची नवी पहाट!**

# जळगाव जिल्ह्यातून आता पाचवा राष्ट्रीय महामार्ग !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत विकासाच्या बाबतीत कायम पिछाडीवर राहिलेल्या जळगाव जिल्ह्यातून आता एक- दोन नाहीतर तब्बल पाच राष्ट्रीय महामार्ग जाणार आहेत. दळणवळण सुविधा अधिक बळकट झाल्याने जिल्ह्याच्या कृषी व औद्योगिक विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्याची आशा त्यामुळे व्यक्त होत आहे.

जळगाव हे मुंबई- हावडा आणि भुसावळ- उधना या लोहमार्गावरील महत्वाचे जंक्शन मानले जाते. येथून देशातील कोणत्याही दिशेला रेल्वेने प्रवासाची सोय उपलब्ध आहे. असे असले तरी शहरातून पूर्वापार जाणाऱ्या आणि अलीकडेच अस्तित्वात आलेल्या राष्ट्रीय महामार्गांचेही जिल्ह्याच्या विकासात तितकेच मोठे योगदान राहिले आहे. त्यापैकी एनएच ५३ हा सुरत (गुजरात) ते पारादीप (ओडिशा) पर्यंतचा एक महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. जो महाराष्ट्रातील धुळे, जळगाव, भुसावळ, अकोला, अमरावती, नागपूर यांसारख्या प्रमुख शहरांमधून जातो. भारताच्या पश्चिम व पूर्व किनाऱ्यांना जोडतो. आशियाई महामार्ग जाळ्याचा भाग असलेला हा महामार्ग हाजिरा बंदराला पारादीप बंदराशी जोडतो. देशाच्या वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतो. एनएच ७५३ एफ महामार्ग जळगावहून पहूर, फर्दापूर, अजिंठा, सिल्लोड, फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर, नेवासा, वडाळा, अहिल्यानगर, पुणे, मावळ, दिगी पोर्टपर्यंत आहे.



जळगावमधून पुणे जाण्यासाठी एकमेव पर्याय असलेल्या या महामार्गाने अजिंठा लेणीला सुद्धा जाता येते. हा महामार्ग आता मुंबई- नागपूर समृद्धी महामार्गाला जोडण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. तसे झाल्यास जळगावहून समृद्धी महामार्गाने मुंबई किंवा नागपूरकडे कमी वेळात पोहोचणे शक्य होईल. पुणे–छत्रपती संभाजीनगर एक्स्प्रेस हायवे अस्तित्वात आल्यानंतर जळगावहून पुण्याला देखील अवघ्या तीन तासांत पोहोचणे शक्य होणार आहे.

एनएच ७५३ जे महामार्ग जळगावहून मनमाडकडे जाणारा एक महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग आहे. जो पाचोरा, भडगाव, चाळीसगाव, नांदगावमार्गे मनमाडपर्यंत जातो. या महामार्गाचे विस्तारीकरण (दुपदरी ते चारपदरी) करण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला आहे. त्याचे बरेच काम पूर्णत्वास आले आहे. वळणावरील भूसंपादनाचा तिढा वेळेवर न सुटल्याने रखडलेल्या या महामार्गासाठी आता पुन्हा हालचाली सुरू झाल्या आहेत. कमी वर्दळीच्या या महामार्गाने जळगावहून मनमाड, चांदवडमार्गे थेट नाशिक देखील गाठता येते. एनएच ७५३ एल हा इंदूरहून हैदराबादकडे जात असलेला राष्ट्रीय महामार्ग आहे.

कृषी व औद्योगिक विकासाला नवे बळ देऊ शकणाऱ्या या महामार्गाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. भारतमाला परियोजनेच्या पहिल्या टप्प्याचा भाग असलेल्या आणि मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा या तीन राज्यांना जोडणाऱ्या या महामार्गासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपये निधी मंजूर आहे. हा महामार्ग जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगरमार्गे तेलंगणातील हैदराबादपर्यंत जाणार आहे. यामुळे इंदूर आणि हैदराबादमधील अंतर सुमारे १५० किलोमीटरने कमी होणार आहे. जळगावहून इंदूरला त्यामुळे फक्त चार तासांत पोहोचता येईल. एनएच ७५३ बी महामार्ग मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूरपासून गुजरात राज्यातील अंकलेश्वरपर्यंत असणार आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या तीन राज्यांना जोडणारा तो एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. या महामार्गाच्या भूसंपादनातील अडथळे दूर होऊन पुढील कामाला गती मिळाल्याने जळगावसह धुळे, नंदुरबार जिल्ह्यांतील केळी क्लस्टरसारख्या कृषी- अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होणार आहे. बऱ्हाणपूर- अंकलेश्वर राष्ट्रीय महामार्ग नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा, शहादा, धुळे जिल्ह्यातील शिरपूर, जळगाव जिल्ह्यातील चोपडा, यावल, रावेर तसेच मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर जिल्ह्यातून जाणार आहे.

# साने गुरुजी विद्यालयात ‘गणित जत्रा’ उपक्रम

## खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांचे मैदानावर अध्यापन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गणितदिनाच्या पार्श्वभूमीवर येथील साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयात गणित जत्रा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खेळीमेळीच्या वातावरणात गणिताचे धडे दिले.





दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टिकोनातून गणित विषयाबाबत हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. चोपडा येथील विवेकानंद विद्यालयाचे प्राचार्य नरेंद्र भावे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना होणाऱ्या चुका, दक्षता कशी बाळगावी याविषयी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात प्रत्यक्ष मैदानावर कार्यक्रम घेण्यात आला. विवेकानंद विद्यालयाचे प्राचार्य नरेंद्र भावे यांनी उद्घाटन केले. संस्थेचे सचिव संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी होते. मुख्याध्यापक सुनील पाटील, ज्येष्ठ शिक्षक विलास चौधरी व गणित शिक्षक डी. ए. धनगर प्रमुख पाहुणे होते. यावेळी गणित शिक्षक हर्षल पवार, निकिता पाटील, यशोदीप बागल उपस्थित होते.

प्राचार्य भावे यांनी सांगितले, की गणित हा सरावाचा विषय आहे. त्यामुळे सरावच तुम्हाला पुढे नेऊ शकतो. मुख्याध्यापक सुनील पाटील यांनी सांगितले, की कोणतीही संकल्पना समजण्यासाठी ती मैदानावर दाखवली तर अधिक प्रभावी होऊ शकते. त्यातून गणिताचे चांगले अध्ययन घडून येते. त्याचे परिणाम देखील चांगले असतात. यातूनच प्रतिभावान गणित तज्ज्ञ तयार होऊ शकतात. संदीप घोरपडे यांनी सांगितले, की महान गणित तज्ज्ञ रामानुजन यांचे गणिताविषयीचे समर्पण कधीही विसरता येणार नाही. त्यांची गणितातील तपश्चर्या आश्चर्यकारक आहे. याप्रसंगी शिक्षक व विद्यार्थ्यांपनी मैदानावर भौमितिक आकृत्या काढल्या होत्या. त्यामुळे मैदानाची सुंदरता खुलून दिसत होती. विद्यार्थ्यांना आकृती समजून घेण्यास मदत होत होती. यावेळी गणित विषयाचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी स्वतः बनवलेले वर्किंग मॉडेल ठेवले होते. प्रत्येक विद्यार्थी आपण बनविलेले मॉडेल व त्यातील गणिती कार्यकारण भाव समजावून सांगत होते. विद्यार्थ्यांनी विविध गणितातील विषयांवर आपले सादरीकरण केले. प्रदर्शनाचा लाभ साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व साने गुरुजी कन्या हायस्कूल मधील सर्व विद्यार्थिनींनी घेतला. विद्यार्थी वैज्ञानिक दृष्टिकोनातून कौशल्य पूर्णपणे बनविलेले साहित्य कुतूहलाने बघत होते. संदीप घोरपडे व मुख्याध्यापक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनात व गणित शिक्षक डी. ए. धनगर यांच्या संकल्पनेने मैदानावर रांगोळी वापरून विविध भौमितिक आकार काढण्यात आल्या. निकिता पाटील, हर्षल पवार, यशोदीप बागल, वैशाली पाटील, जयेश मासरे, किरण सोनार, संदीप निकुंभ, शुभम निकम व राजश्री महाजन यांनी सहकार्य केले.

## दुधावर साय कशी येते?

बहुतांश स्वयंपाकघरात दूध असतेच. त्यापासून दही, ताक बनवतात. दुध गरम केले की त्यावर एक जाडसर थर आपल्याला दिसतो. ज्याला आपण साय किंवा मलाई म्हणतो. आधी दूधावर साय नसते. मात्र, ते गरम केल्यावर त्यावर साय येते. दुधावर साय येण्याची प्रक्रिया अगदी नैसर्गिक आहे. त्यामागे दुधावरील चरबीचे शास्त्रीय कारण दडलेले आहे. दुधात पाणी, प्रोटीन, लॅक्टोन तसेच ठराविक प्रमाणात चरबी असते. दुध उकळल्यावर त्यातील प्रोटीन आणि चरबी एकत्र येऊन पातळ पडदा तयार करतात. जेव्हा दूध थंड होऊ दिले जाते तेव्हा हा पडदा जाड होत जातो आणि दूधातील चरबीचे कण पाण्यापेक्षा हलके असल्यामुळे दुध उकळून थंड झाल्यावर हे कण वरच्या बाजुस सायीच्या स्वरूपात जमा होतात.

म्हशीच्या दुधात चरबीचे प्रमाण जास्त असल्याने त्यात साय जास्त प्रमाणात दिसते, तर गायीच्या दुधात साय तुलनेने कमी असते. टोंड किंवा डबल-टोंड दुधात तर चरबी कमी असल्याने साय ई, के आणि गूड फॅट असते जे शरीरासाठी उपयुक्त ठरते.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# झाले इलेक्शन, आता जपा रिलेशन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : पालिकेची निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली आहे. निकालही जाहीर झाला आहे. निवडणूक काळात राजकीय पक्षांमध्ये आरोप- प्रत्यारोप, मतभेद आणि तणावाचे वातावरण पाहता आता निवडणूक संपल्यानंतर शहराच्या विकासासाठी सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून ‘इलेक्शन नव्हे, रिलेशन’ जपण्याची गरज असल्याच्या भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहेत. जय- पराजयाच्या गणितात काही उमेदवारांना यश तर काहींना अपयश आले. मात्र, लोकशाही प्रक्रियेत हे होतच असते. आता नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी शहराच्या विकासासाठी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे.

शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. यासाठी सर्व नगरसेवकांनी एकदिलाने काम करावे, अशी नागरिकांना अपेक्षा आहे. राजकीय मतभेद विसरून सामाजिक सलोखा, परस्पर विश्वास आणि सौहार्द टिकवणे गरजेचे आहे.

# समुद्रात सापडला सोन्याचा मोठा खजिना!

## एका महिन्यातच दुसऱ्यांदा लॉटरी, ड्रॅगन होणार मालामाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चीनने समुद्राखाली सोन्याचा मोठा साठा शोधून काढला आहे. हा साठा आशियातील सर्वात मोठा सागरी सोन्याचा साठा मानला जात आहे. विशेष म्हणजे एका महिन्यात चीनला दुसऱ्यांदा साठा सापडला आहे. ‘साउथ चायना मॉर्निंग पोस्ट’ च्या रिपोर्टनुसार, शेडोंग प्रांतातील यानताई येथे लाइझोउच्या किनाऱ्यावर हा प्रचंड सोन्याचा साठा सापडला आहे. या शोधामुळे लाइझोउमधील सोन्याचा एकूण साठा ३ हजार ९०० टनांपेक्षा जास्त झाला आहे. हा साठा चीनच्या एकूण सोन्याच्या साठ्याच्या सुमारे २६ टक्के आहे.



### अव्वल स्थान

नव्या शोधामुळे चीन आता सोन्याचा साठा आणि उत्पादन या दोन्ही बाबतीत जगात पहिल्यास्थानी पोहोचला आहे. यानताई प्रांताच्या सरकारने एका परिषदेत ही माहिती दिली. मात्र, समुद्राखालील सोन्याच्या साठ्याचे नेमके प्रमाण किती आहे, हे अधिकाऱ्यांनी अजून स्पष्ट केलेले नाही. गेल्या एका महिन्यात चीनला सोन्याचा दुसरा साठा सापडला आहे. एससीएमपीच्या रिपोर्टनुसार याआधी नोव्हेंबरमध्ये लियाओनिंग प्रांतात १ हजार ४४४ टनांपेक्षा जास्त सोन्याचा साठा सापडला होता. हा साठा १९४९ मध्ये कम्युनिस्ट चीनच्या स्थापनेनंतरचा सर्वात मोठा एकल सोन्याचा साठा मानला जात आहे.

### चीनचे वर्चस्व

शिनजियांगजवळील कुनलुन पर्वतरांगेतही एक हजार टनांपेक्षा जास्त सोन्याचा साठा सापडल्याची माहिती मिळाली होती. विशेष म्हणजे, जियाओडोंग द्वीपकल्प हा आधीपासूनच जगातील तिसरा सर्वात मोठा सोन्याच्या खाणींचा पट्टा म्हणून ओळखला जातो. येथे चीनच्या एकूण सोन्याच्या साठ्याचा सुमारे एक चतुर्थांश भाग आहे. चीन हा जगातील सर्वात मोठा सोने उत्पादक देश आहे. ‘चायना गोल्ड असोसिएशन’नुसार, गेल्या वर्षी देशात ३७७ टनांपेक्षा जास्त सोन्याचे उत्पादन झाले. उत्पादन जास्त असूनही, प्रमाणित साठ्याच्या बाबतीत चीन अजूनही दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि रशिया यांच्या मागे होता. मात्र, या नवीन शोधामुळे आता चीनचे या क्षेत्रातही वर्चस्व निर्माण झाले आहे.

### एआयचा वापर, प्रचंड गुंतवणूक

एससीएमपी नुसार, चिनी शास्त्रज्ञ आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), जगातील सर्वात शक्तिशाली ग्राउंड-पेनेट्रेटिंग रडार आणि अत्याधुनिक मिनरल एक्सप्लोरेशन सॅटेलाइट्सचा वापर करत आहेत. गेल्या वर्षी चीनने यासाठी ११६ अब्ज युआनची गुंतवणूक केली, तर २०२१ पासून आतापर्यंत एकूण खर्च सुमारे ४५० अब्ज युआनपर्यंत पोहोचला आहे.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘चमकण्याची’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# नाव बदलल्याने खरोखर नशीब उजळते का?

## प्रेमानंद महाराज यांनी दिले स्पष्ट उत्तर



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अलीकडे एका भक्ताने प्रेमानंद महाराज यांना प्रश्न विचारला, की आजकाल अनेक लोक आपले नाव बदलतात किंवा नावात अंक, अक्षरे किंवा स्पेलिंगमध्ये बदल करतात. खरोखर यामुळे नशीब बदलते का?

या प्रश्नाचे उत्तर देताना प्रेमानंद महाराज यांनी अतिशय सोप्या शब्दांत आपले मत मांडले. ते म्हणाले, की जर नाव बदलल्याने किंवा त्यात थोडाफार बदल केल्याने नशीब बदलत असते,तर आज प्रत्येक व्यक्ताने हे केव्हाच केले असते.

महाराजांनी भक्तांना सांगितले, की तुम्ही स्वतः करून पाहा आणि मग अनुभव सांगा. ते स्पष्ट म्हणाले, की अशा प्रकारच्या उपायांवर विश्वास ठेवणारे लोक भ्रमात असतात आणि प्रत्यक्षात मूर्खपणा करत असतात. फक्त अंगठी घालणे, छल्ला धारण करणे किंवा जंतर-मंतर बांधून घेतल्याने आयुष्यात काहीही बदल होत नाही. महाराजांनी समजावून सांगितले, की जर खरोखर नशीब बदलायचे असेल, तर त्याचा एकच मार्ग आहे तो म्हणजे इश्वराचे नामस्मरण आणि मेहनत.

नामस्मरणामुळे मन शुद्ध होते. विचार सकारात्मक होतात आणि कर्म योग्य दिशेने वाटचाल करतात. ते पुढे म्हणाले, की अनेक वेळा लोकांना वाटते, की एखाद्या उपायामुळे अचानक फायदा झाला. पण प्रत्यक्षात तो आधी केलेल्या पुण्यकर्मांचा फलित असतो. अशा घटना फक्त योगायोग किंवा संयोग म्हणूनच समजाव्यात.

### नामस्मरण हाच खरा उपाय

प्रेमानंद महाराज यांनी पुढे स्पष्ट केले, की नाव बदलल्याने किंवा त्याच्या स्पेलिंगमध्ये बदल केल्याने ना स्वप्न पूर्ण होतात, ना जीवनातील अडचणी संपतात. स्वप्न साकार करण्यासाठी मेहनत, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण प्रयत्न अत्यावश्यक असतात. त्याचबरोबर इश्वराचे नामस्मरण मनाला बळ देते आणि कठीण काळात शक्ती बनून साथ देते.

# कोणत्या देवाचा कसा करावा नामजप?

संपूर्ण विश्व स्पंदनशील आहे. विश्वातील प्रत्येक वस्तू म्हणजेच स्पंदनाचा समूह आहे. मनुष्य हा सुध्दा स्पंदनाचा समूह आहे. पूर्वजन्मातील कर्मानुसार काही स्पंदन लहरी शुद्ध आहेत तर बऱ्याच अंशी अशुद्ध आहेत, तर या व्यक्तीच्या मनात नेहमी चांगल्या-वाईट विचारांचा गोंधळ उडालेला असेल. तो क्षणात भावूक बनेल तर क्षणात क्रोधी बनेल. म्हणून प्राचीन ऋषींनी मानवांना ईश्वर भक्ती म्हणजे नामस्मरण, स्तोत्र पठण, ग्रंथ वाचन, ध्यान, चिंतन व संत सहवास करण्याचा आग्रह केलेला आहे. या गोष्टींनी आपली स्पंदने शुद्ध होत असतात. आपल्यातील दोष निघून जाऊ लागतात. आपण शुद्ध पवित्र बनतो व प्रसन्नता, सद्गुण, सदविचार यांची प्राप्ती होते. श्रीगुरू भक्ताची अशुद्ध स्पंदने (पाप व दुःखे) खेचून घेत असतात. त्यामुळे श्रीगुरूंच्या सहवासाची आस धरावी.

नामस्मरणामुळे परमशांती मिळते. निरंतर नामस्मणामुळे कुळाची परंपरा शुद्ध होते. नामस्मरण करण्यासाठी विशिष्ट काळ-वेळेचे बंधन नाही. नामाचे महात्म्य इतके अपूर्व आहे की नाम उच्चारणारा व ते ऐकणारा दोघेही उद्धरून जातात. भक्ताचे सर्व दोष हरण करून नाम त्याला दोषमुक्त करते. म्हणून जड-जीवांना तारणारे नामस्मरणच आहे. एकाच नामस्मरणाची शेकडो-हजारो आवर्तने झाल्यावर आपली स्पंदने त्या देवतेचा आकार घेऊ लागतात. प्रभू श्रीरामचंद्रांची भक्ती करणारा प्रभू श्रीरामचंद्र होतो. भगवान श्रीकृष्णांची भक्ती करणारा भगवान श्रीकृष्ण होतो. तसेच सदगुरूंची भक्ती करणारा सदगुरूरूप होतो. एखाद्या देवतेचे नाव किंवा मंत्र पुनःपुन्हा म्हणत राहणे म्हणजे नामस्मरण होय.

**शिवाचा नामजप :**



'ॐ नमः शिवाय।' हा नामजप करताना नामजपात तारक भाव येण्यासाठी 'नमः' या शब्दावर जोर न देता तो हळूवारपणे म्हणावा. यावेळी आपण शिवाला साष्टांग नमस्कार करत आहोत, असा भाव ठेवावा.

**श्रीरामाचा नामजप :**



'श्रीराम जय राम जय जय राम।' हा नामजप करताना तारक भाव येण्यासाठी नामजपातील पहिल्यांदा येणारा 'जय राम' व त्यानंतरचा 'जय जय 'मधील दुसरा 'जय' हे शब्द म्हणताना त्यावर जोर न देता ते हळूवारपणे उच्चारावेत व त्यावेळी 'श्रीरामा, मी तुला पूर्णतः शरण आलो आहे', असा भाव ठेवावा.

**मारुतीचा नामजप :**



'हं हनुमते रुद्रात्मकाय हुं फट' हा नामजप हनुमंतासाठी करावा.


लंकेत राक्षसांचा नाश करणारा मारुती. देवतेप्रती सात्विक भाव निर्माण होण्यासाठी तारक रूपाचा नामजप आवश्यक असतो, तर देवतेकडून शक्ती व चैतन्य ग्रहण होण्यासाठी मारक रूपाचा नामजप आवश्यक असतो.

**गणपतीचा नामजप :**



'ॐ गं गणपतये नमः।' (श्रीगणेशाय नमः) हा नामजप करताना नामजपात तारक भाव येण्यासाठी 'नमः' या शब्दावर जोर न देता तो हळूवारपण म्हणावा. यावेळी आपण श्रीगणेशाला साष्टांग नमस्कार करत आहोत, असा भाव ठेवावा.

**दत्ताचा नामजप :**



'श्री गुरुदेव दत्त।' या नामजपातील 'गुरुदेव' हा शब्द म्हणताना संपूर्ण शरणागतीचा भाव ठेवावा आणि 'गुरुदेव' या शब्दानंतर थोडा वेळ थांबून 'दत्त' हा शब्द म्हणावा.

**श्रीकृष्णाचा नामजप :**



'ॐ नमो भगवते वासुदेवाय।' या नामजपातील 'नमो' हा शब्द म्हणताना संपूर्ण शरणागतीचा भाव ठेवावा. 'भगवते' या शब्दानंतर थोडा वेळ थांबून त्यानंतर 'वासुदेवाय' हा शब्द म्हणावा.

### नामस्मरणाचे फायदे

एकाग्रता वाढते तेव्हा चित्त शुद्ध होते. वाचासिद्धी प्राप्त होऊ शकते. दुष्ट विचारांचा प्रभाव मनावर होत नाही. मन कायम आनंदी राहते. सदैव देवतेचे स्मरण केल्याने सर्व मनोवांच्छित इच्छा पूर्ण होऊ शकतात.

# तुम्ही नाम घ्यायला लागा, भगवंताचे प्रेम येईलच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ज्या माणसाला आपला स्वार्थ साधायचा नाही त्याला कमी पडणे शक्यच नाही. जेथे निःस्वार्थीपणा आहे तेथे भगवंताला पुरवठा केलाच पाहिजे. आपण जगावर प्रेम केल्याशिवाय परत प्रेम मिळणार नाही. जो भगवंताच्या प्रेमात तल्लीन झाला त्याला बाकीच्या गोष्टींची आठवण राहत नाही. ज्याप्रमाणे मालक घरात आला की चोर पळालाच म्हणून समजा, त्याचप्रमाणे जो भगवंताच्या प्रेमात रमला, तो खात्रीने सुखी बनला; कारण त्याची देहबुद्धी पळून जाते. म्हणून भगवंताला अशा प्रेमाने आळवावे, की त्याच्या डोळ्यांत पाणी यावे. आळवताना आपल्या डोळ्यांत पाणी आले की भगवंताच्या डोळ्यांत पाणी येते.

भगवंताचे प्रेम लागायला सत्संगतीचा मार्ग अतिशय उत्तम आहे यात शंकाच नाही. परंतु सत्संगती सर्वांनाच मिळेल असे काही निश्चयाने सांगता येणार नाही. दुसरा मार्ग विचाराचा आहे. नेहमी चांगले आणि पवित्र विचार मनात बाळगावेत. भगवंताने सर्वांवर कृपा करावी, त्याने सर्वांचे कल्याण करावे, त्याचे प्रेम सर्वांना यावे, असे विचार नेहमी मनात ठेवून संतांच्या विचारांचे मनन करावे. सर्वांचे कल्याण चिंतण्यात स्वतःचे कल्याण अनायासे होत असते. पण आपण असे पाहातो की, आपले विचारसुद्धा नेहमी स्थिर राहात नाहीत. नामस्मरणाला बसल्यानंतरसुद्धा किती अपवित्र विचार आपल्या मनात येत असतात, याचा सर्वांना अनुभव आहे ना ? तेव्हा चांगले विचार मनात बाळगणे हेही आपल्या हातात नाही. आता तिसरा मार्ग म्हणजे नाम. नाम हे एकच साधन असे आहे की, आपल्याला ते प्रयत्नाने घेता येईल. ते नाम तुम्ही सर्वांनी निःशंकपणे घ्या. त्या नामाच्या विरुद्ध तुम्हाला कुणीही काहीही सांगितले तरी त्याचे ऐकू नका. ते नाम कसे घ्यावे वगैरे चिकित्सेत तुम्ही पडू नका. तुम्ही नाम घ्यायला लागा, भगवंताचे प्रेम तुम्हाला आल्याशिवाय रहाणार नाही. अगदी सतत निश्चयाने नाम घ्या. जिथे नाम तिथे माझा राम आहे, हा माझा विश्वास तुम्ही बाळगा. दुसरे काही एक न करता सतत निश्चयाने नामात राहाणाऱ्या माणसाला संतांची भेट होऊन ते त्याचे कल्याण करतील. भगवंताचे नाम ही ठिणगी आहे. ती फुलवली तर सबंध जग भरून जाईल एवढी मोठी होऊ शकते. ही नामाची ठिणगी आपण सतत जागृत ठेवू या. जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला आणि दैन्यपणा संपला. ते नाम तुम्ही सर्वांनी मनापासून घ्या, आणि सर्वांनी अगदी आनंदात राहून सुखाने संसार करा.

# घरात गोमूत्र का शिंपडावे?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये गोमूत्राला महत्त्वाचे स्थान आहे. शुभ कार्यात काही अशुभ घडू नये म्हणून गोमूत्र शिंपडले जाते. त्यामुळे पूजा, लग्न किंवा अन्य कोणताही समारंभ असो त्यावेळी गोमूत्र शिंपडले जाते. तर तुमच्या कुंडलीतील ग्रहात दोष असल्यास किंवा वास्तुदोष असल्यास तुम्ही दर सोमवारी आणि शुक्रवारी थोडेसे गोमूत्र पूर्ण घरात शिंपडल्याने त्रास कमी होतो, अशी धारणा आहे.

सगळ्या परंपरांच्या मागे मनोवैज्ञानिक किंवा वैज्ञानिक कारणे आहेत आणि त्यांचा संबंध धर्माशीही आहे. घर-परिवारातील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी ऋषीमुनींनी गोमूत्र शिंपडण्याचा अचूक उपाय सांगितला आहे. जुन्या काळापासून गोमूत्र शिंपडण्याची परंपरा चालत आली आहे. शास्त्रात गाईला पूजनीय आणि पवित्र मानले आहे. गाईला माता असे संबोधले आहे. त्यामुळे गाईपासून मिळणारी प्रत्येक गोष्ट पवित्र आहे. हिंदू धर्मात गायीला पवित्र मानले गेले आहे. वास्तुनुसार गायीचे गोमूत्र घरातील सगळे वास्तुदोष समाप्त करण्यास उपयुक्त ठरते. गायीची पूजा केल्याने आपले पाप नष्ट होते, अशी धारणा आहे.

काही बाबतीत जर तुम्हाला त्रास होत असेल, घरातील सदस्यांमुळे मानसिक ताण आणि क्लेश सहन करावा लागत असेल, तर त्यापासून मुक्त होण्यासाठी अनेक परंपरा आहेत. वैदिक काळापासून अशा काही परंपरा आहेत ज्या घराला समृद्ध ठेवतात. त्यापैकी एक म्हणजे घरात गोमूत्र शिंपडणे.

गोमूत्र प्राशन केल्याने मूत्रपिंडाचे आजार व मूत्रविकार बरे करता येतात. अन्नातून युरिया, कीटकनाशके शरीरात जातात. पाणी आणि हवेतूनही दूषित घटक शरीरात जातात. त्याचा ताण मूत्रपिंडावर येतो आणि त्यातून मूत्रपिंडाचे विकार वाढतात. गोमूत्र हे त्यावर प्रभावी औषध आहे. आता गोमूत्राचे फायदे लक्षाते घेतले पाहिजेत. यात घरातील वास्तुदोष मिटण्यासाठी रोज घरात गोमूत्र शिंपडावे. गोमूत्रामुळे वातावरणातील सूक्ष्म कीटाणू नष्ट होण्यास मदत होते. तर ज्या घरात गोमूत्र रोज शिंपडले जाते तेथे सगळ्या देव-देवतांची कृपादृष्टी प्राप्त होते, अशी समजूत आहे. गोमूत्र शिंपडल्याने धान्य आणि धनाची कधीच कमतरता जाणवत नाही.




# तुळशीची मंजिरी देते आर्थिक सुबत्ता!

## तुळशीवरून तोडलेल्या मंजिरीचे काय करावे? जाणून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात तुळशीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तुळस ही भगवान विष्णू प्रिय असून प्रत्येक घराघरांत तुळस पाहायला मिळते. घर लहान असो वा मोठे तुळशीचे रोपटे गॅलरीत किंवा अंगणात लावल जाते. तुळशीला मंजिरी आल्याचे तुम्ही पाहिले असेल. तुळशीची मंजिरी ही फक्त बीज नसून देवी तुळशीच्या अलंकाराचे आणि शुभलाभाचे प्रतीक मानले जाते. धार्मिक मान्यतेनुसार तुळशीला मंजिरीच्या भारातून मुक्त करणे आवश्यक असते. जेणेकरून आपल्या घरातील तुळस सदैव ताजी-तवानी, हिरवीगार आणि प्रसन्न राहील. घरात तुळशीच्या पवित्र उर्जेचा अखंडपणे प्रवाह सुरू असेल. तुळशीला जर मंजिरी आली तर काय करावे याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

### तुळशी मातेला होतात कष्ट

शास्त्रांमध्ये असे सांगितले आहे, की तुळशीच्या रोपावर मंजिरी दीर्घकाळ राहिल्यास तुळशी मातेला कष्ट होतात, त्यांची दिव्य ऊर्जा मंदावते. जसे आपल्या अंगावर गरजेपेक्षा जास्त कपडे असतील किंवा एखादी अतिरिक्त गोष्ट लादली गेली तर आपला जीव गुदमरतो किंवा आपल्याला त्रास होतो. तुळशीला सुद्धा मंजिरीमुळे असेच जाणवते असे म्हणतात. दरम्यान, ही गोष्ट पूर्णपणे श्रद्धा आणि वैयक्तिक भावनांवर आधारित आहे.



### १) मंजिरी भगवान विष्णूंना अर्पण करा

तुळस भगवान विष्णूंना अत्यंत प्रिय आहे. मंजिरी तोडल्यानंतर ती स्वच्छ धुवून घ्या आणि कोणत्याही पूजा, व्रत किंवा अनुष्ठानाच्या वेळी भगवान विष्णू किंवा त्यांच्या अवतारांच्या चरणी अर्पण करा. असे केल्याने भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी दोघांची कृपा लाभते आणि घरात शांतता, सुख-समृद्धी टिकून राहते.

### २) वापर शक्य नसेल तर विसर्जन करा

जर तुम्ही मंजिरी तत्काळ वापरणार नसाल, तर ती गंगा, यमुना यांसारख्या पवित्र नदीत विसर्जित करा. समजा तुम्हाला ते शक्य नाही झाले तर देवघरात ठेवलेल्या गंगाजलमध्ये त्या मंजिरी श्रद्धेने ठेवू शकता. हा मंजिरीला योग्य मान देण्याचा सर्वोत्तम मार्ग मानला जातो.

### ३) मंजिरी धनस्थानी ठेवण्याची परंपरा

स्वच्छ लाल कपड्यात किंवा ओढणीत मंजिरी गुंडाळून, तुम्ही जेथे धनसंपत्ती ठेवता तेथे ठेवावी. तुळशीमध्ये माता लक्ष्मीचा निवास असल्यामुळे हा उपाय धनवृद्धी वाढवतो. समजा तुम्ही तिजोरीत तुळशीची मंजिरी ठेवत असाल तर मंजिरी दर शुक्रवारी आठवणीने बदलायला हवी.

### ४) आंघोळीच्या पाण्यात उपयोग करा

दैनिक पूजेनंतर उरलेली मंजिरी एका छोट्या डब्यात साठवून ठेवा. स्नान करताना त्या मंजिरीतील काही दाणे पाण्यात टाका. यामुळे सकारात्मक ऊर्जा वाढते आणि अशुभ आणि नकारात्मक ऊर्जा दूर जाते.

### ५) धूपामध्ये तुळशीच्या मंजिरीचा वापर

घरात धूप घालत असताना त्यात तुळशीची मंजिरी टाकावी, यामुळे नकारात्मक ऊर्जा कमी होती. घरात सकारात्मक ऊर्जा वाढून वातावरण मंगलमय होते.

### ६) मंजिरी देते आर्थिक सुबत्ता

घराच्या उत्तर दिशेला गंगाजल आणि तुळशीच्या मंजिरी ठेवून हे पाणी रोज संपूर्ण घरात शिंपडले तर नकारात्मक ऊर्जा घरात राहणार नाही आणि घराची आर्थिक स्थितीही मजबूत होईल. शुक्रवारी माता लक्ष्मीला तुळशीची मंजिरी अर्पण केल्यास देवी लक्ष्मीचा आशीर्वाद कायम राहतो.

### ७) दाम्पत्य जीवनातील प्रेम वाढविण्यासाठी

पती-पत्नीमध्ये मतभेद किंवा ताणतणाव असेल, तर दोघांनी मिळून तुळशीची मंजिरी कृष्ण भगवान किंवा भगवान विष्णूंना अर्पण करावी. हा उपाय परस्पर प्रेम, समजूतदारपणा वाढवतो. तसेच मंजिरीतील सुटलेले बीजे वाटून तिलक लावल्यास कौटुंबिक सुख समृद्धी वाढते, असेही सांगितले जाते.

(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)